| 58. | Sanskar Shedhuri | 28 October 2009 |
|---|---|---|

# सौरऊर्जेची साधने रास्त दरात मिळावीत : अब्दुल्ला

## सीएमएस आंतरराष्ट्रीय वातावरण चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन

**चैत्राली चांदोरकर : सकाळ वृत्तसेवा**

नवी दिल्ली, ता. २८ : सूर्यप्रकाशाचा अधिकाधिक वापर केल्यास मोठ्या प्रमाणात वीजबचत करता येऊ शकते; मात्र यासाठी सर्वसामान्य माणसाला रास्त दरात व मुबलक प्रमाणात सौरऊर्जेची अत्याधुनिक साधने सरकारने उपलब्ध करून देण्याची गरज आहे. यामुळे पर्यावरणाचे नुकसान टाळता येईल आणि रोजगाराच्या नवीन संधीही उपलब्ध होतील, असे मत केंद्रीय ऊर्जा विकासमंत्री फारूक अब्दुल्ला यांनी मंगळवारी व्यक्त केले.

पर्यावरणाच्या विविध समस्यांवर विचारमंथन करण्यासाठी आयोजिण्यात आलेल्या 'सीएमएस आंतरराष्ट्रीय वातावरण चित्रपट महोत्सवा'चे उद्घाटन अब्दुल्ला यांच्या हस्ते झाले, या वेळी युनायटेड नेशन्स एन्व्हायर्न्मेंट प्रोग्रॅम (यूनेप)चे माहिती प्रसारण विभागाचे संचालक सतीश सिन्हा, अमेरिकी दूतावासाचे अधिकारी मायकेल पिल्टिएर, एचएसबीसी कंपनीच्या नयना लाल किडवाई, 'सीएमएस'चे अध्यक्ष डॉ. एन. भास्कर राव, संचालक पी. एन. वासंती आदी उपस्थित होते.

अब्दुल्ला यांनी मनोगतामध्ये विकास आणि पर्यावरणाचा ऱ्हास याबद्दल मार्गदर्शन केले. ते म्हणाले, "पर्यावरणाबद्दल सातत्याने चर्चा केली जाते; मात्र जीवनशैलीत बदल करण्यास नागरिक तयार नाहीत. वृक्षतोडीमुळे जंगले नष्ट होत आहेत. वन्यप्राण्यांनी मानवी वस्तीत येण्यास सुरवात केली आहे. ग्रामीण भागात गॅस न पोचल्याने आजही झाडे तोडून ही मंडळी स्वयंपाक करतात. शहरात मात्र सर्वच सुविधा उपलब्ध असल्याने नागरिकांना त्यांचे मूल्य माहीत नाही. गरजेपेक्षा अधिक ओरबाडण्याची त्यांची वृत्ती आहे. हे असेच सुरू राहिले तर आपण पुढच्या पिढीला काय देणार, असा प्रश्न उभा राहतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने निसर्गसंवर्धनाच्या चळवळीत सहभागी होण्याची गरज आहे. आपल्या दैनंदिन जीवनशैलीत बदल केले तर नक्कीच चांगले परिणाम पाहायला मिळतील," असेही त्यांनी नमूद केले.

'सोलर एनर्जी मिशन' या योजनेमार्फत केंद्र सरकार लवकरच नवीन उपक्रम राबविणार आहे. ऊर्जाबचतीबरोबरच उद्योग क्षेत्राला नवीन संधी तसेच रोजगारनिर्मितीही यामुळे शक्य होईल, अशी माहिती अब्दुल्ला यांनी दिली.

३१ ऑक्टोबरपर्यंत हा महोत्सव दिल्लीत साजरा करण्यात येणार असून, यात जागतिक तापमानवाढ, वन्यप्राणी आणि मानव संघर्ष, शाश्वत ऊर्जा, इको टुरिझम आणि निसर्गसंवर्धन अशा विविध विषयांवर तज्ज्ञांच्या उपस्थितीत सविस्तर चर्चा होणार आहेत. याचबरोबर पर्यावरणावर आधारित लघुपटही प्रदर्शित करण्यात येणार आहेत.



नवी दिल्ली : 'सीएमएस वातावरण आंतरराष्ट्रीय महोत्सवा'चे उद्घाटन केंद्रीय अपारंपरिक ऊर्जा विकास मंत्री फारूक अब्दुल्ला यांच्या हस्ते झाले.